07 जा.क्रवि-1/.मा.अ./क.4(1)(ब)/कार्यवाही/सन2021
उपनिबंधक सहकारी संस्था, मालेगाव यांचे कार्यालय,
दिनांक 07 / 01 /2021

प्रति,
मा. जिल्हा उपनिबंधक ,
सहकारी संस्था, नाशिक ,

**विषय :- सार्वजनिक प्राधिकारणाने स्वत:हून किंवा सकारात्मक तत्वावर माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 4(1)(b) अन्वये माहिती प्रकट करणेबाबत...**
**(दि. 1 जानेवारी 2021 रोजी प्रसिध्द करण्यासाठी)**

संदर्भ :- 1.माहिती अधिकार अधिनियम 2005 चे कलम 4(1)(ब)
2.आपले कार्यालयाकडील पत्र जा.क्र संवका /मा.अ/क.4(1)(ब) /कार्यवाही/सन 2020 दिनांक 30 /12/2020 .

वरील संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते की,

2/- संदर्भ क्र.1 व 2 अन्वये या कार्यालयाची माहिती अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 4(1)(ब) अन्वये प्रकट कर 1 ते 17 मुद्दयांबाबतची माहिती दरवर्षी दिनांक 1 जानेवारी व दिनांक 1 जुलै असे वर्षातून किमान दोन वेळा अदयावत करुन करणेबाबत सूचित केलेले आहे.

त्यानुसार या कार्यालयाची दिनांक 1जानेवारी 2021 अखेरची प्रसिध्द करावयाची माहिती तयार करुन या कार्या सुचना फलकावर प्रसिध्द केली असुन माहितीस्तव सविनय सादर.

occ

उपनिबंधक,
सहकारी संस्था, मालेगाव

**केंद्रीय माहिती अधिकार 2005**

**चे कलम 4 (1) (ब) प्रमाणे**

**1 जानेवारी 2021 अखेर 1 ते 17 उपकलमांची**

**माहिती प्रसिध्द करणेबाबत**

**कार्यालयाचे नांव**

**उपनिबंधक, सहकारी संस्था मालेगाव**

**मार्केट यार्ड आवार, मालेगाव कॅम्प,मालेगाव जि नाशिक**

मुद्दा क्रमांक :- 1 (एक)

कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील

**उपनिबंधक, सहकारी संस्था, मालेगाव यांचे नियंत्रणाखालील विषय :-**

- प्रशासन. (तालुका)
- तालुक्यातील सहकारी संस्थांवर नियंत्रण तसेच वैधानिक कार्यवाही
- तालुक्यातील सर्व पतसंस्थांवर नियंत्रण तसेच वैधानिक कार्यवाही.
- तालुक्यातील क व ड वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुका.
- तालुक्यातील हातमाग व यंत्रमाग सहकारी संस्था, कामकाज.
- शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे.

**मुद्दा क्रमांक ü:-2 (दोन)- अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये**

उपनिबंधक व अधिनस्त अधिकारी यांच्या जबाबदा-या

| अधिकार पद | प्रशासनिक अधिकार | कायदा/नियम/आदेश/राजपत्र |
|---|---|---|
| उपनिबंधक व त्यांच्या अधिनस्त अधिकारी व कर्मचारी | सहकारी संस्था व उपविधी नोंदणी व उपविधीतील सुधारणा | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 196 कलम 9 , कलम 13 व 14 व नियम 4,5. व 13 |
| | संस्थांचे वर्गीकरण करणे आणि त्यांची यादी प्रसिध्द करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 196 कलम 12(3 अ) व नियम 10 |
| | संस्थांचे एकीकरण, हस्तांतर, विभागणी यांस मंजुरी देणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 196 कलम 17 व 18 नियम 16 व 17 |
| | संस्थेची पुनर्रचना करण्याचा आदेश देणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 196 कलम 19 व नियम 18 |
| | संस्थांच्या भागीदारीस परवानगी देणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 196 कलम 20 |
| | संस्थेची नोंदणी रद्द करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 196 कलम 21 |
| | एखादया संस्थेचा सदस्य म्हणून दाखल करुन घेण्यास नकार देण्यात आलेल्या व्यक्तिीने केलेले अपिल निकालात काढणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 196 कलम 23 |
| | एखादया सदस्याची संस्थेतून हकालपटी करण्याचे ठरावास मान्यता देण्यास किंवा सदस्यास पुन:सदस्य म्हणून दाखल करुन घेण्यास संमती देणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 196 कलम 35 व नियम 28 व 29 |
| | | |
| | संस्थेचा निधी विशिष्ट रितीने गुंतविण्या बदल आदेश देणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 196 कलम 70 व नियम 55 |
| | एखादया संस्थेच्या किंवा संस्था वर्गाच्या समितीवरील सदस्यांची कमाल संख्या निश्चित करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 196 कलम 73 |
| | सहकारी संस्थाच्या निवडणुकी घेणे व निवडणुक घेण्याचा खर्च विहीत रितीने वसुल करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 196 कलम 73 ए, क |

| | | |
|---|---|---|
| | वार्षिक सर्वसाधारण सभा बोलविण्यास किंवा तिच्या पुढे ताळेबंद ठेवण्यांच्या बाबतीत कसूर करणारा किंवा विशेष साधारण सभा बोलविण्यात कसूर करणारा अधिकारी किंवा समितीचा सदस्य यास निवडणूकीस अपात्र ठरविणे किंवा असा अधिकारी संस्थेचा नोकर असल्यास त्यास दंड करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 75 व 76 |
| | वार्षिक सर्वसाधारण सभा बोलविण्यासाठी मुदत वाढविणे किंवा अशी सभा बोलविण्याचा एखादया इसमास अधिकार देणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 75 |
| | संस्थेतील विशेष सर्वसाधारण सभा बोलविणे किंवा ती बोलविण्याचा एखादया इसमास अधिकार देणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 76 |
| | समितीच्या नवीन समितीच्या सदस्याची किंवा प्रशासकाची नेमणूक करणे/बदलणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 77 अ |
| | समिती काढून टाकणे आणि नविन समिती किंवा प्रशासक नेमणे, सभासद काढून टाकणे व नेमणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 78 |
| | संस्थेस बंधनकारक असतील अशी कामे करुन घेणे आणि त्यास कसुर करण्यास दंड करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 79 |
| | संस्थेचे दप्तर किंवा मिळकतीचा ताबा घेणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 80 |
| | संस्थेचे दरवर्षी हिशोब तपासणे किंवा तपासून घेणे व हिशोबातील दोष सुधारण्याचा संस्थेस आदेश देणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 81 व 82 |
| | संस्थेची रचना, कामकाज आणि आर्थिक स्थिती याबाबत चौकशी करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 83 |
| | चौकशी किंवा तपासणी यांचे खर्चा बद्दल हुकुम करणे आणि ती वसूल करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 85 व 86 |
| | संस्थेची पुस्तके तपासणी किंवा तपासून घेणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 84 |
| | संस्थेच्या कारभाराचे निरीक्षण करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 89 अ |
| | विविक्षित सहकारी संस्थांच्या देय थकबाकीची वसुली करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 101 |
| | सहकारी संस्थेस व्यवहार बंद करणे तसेच ऋण परिशोधकाची नेमणूक | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 102 व 103 |

मुद्दा क्रमांक :-3 (तीन) -

## निर्णय घेण्याच्या प्रक्रियेस अनुसरण्यात येणारी
## कार्यपध्दती, तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली

**उपनिबंधक, सहकारी संस्था, मालेगाव यांची कार्यक्षेत्र रचना**

**सहकार खात्याची क्षेत्रीय रचना**

**सचिव (सहकार) (मंत्रालय स्तर)**

↓

**सहकार आयुक्त (राज्य मुख्यालय स्तर)**

↓

**विभागीय सहनिबंधक (विभाग स्तर)**

↓

**जिल्हा उपनिबंधक ú, (जिल्हा स्तर)**

↓

**तालुका/उप/सहाय्यक निबंधक (तालुका स्तरúü)**

↓

---

| ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
|---|---|---|---|---|
| सहकार अधिकारी प्रथम श्रेणी | मुख्यलिपिक | सहकार अधिकारी व्दितीय श्रेणी | सहाय्यक सहकार अधिकारी | लिपीक |

**मुद्दा क्रमांक ú:-4 (चार ) -**

स्वत: ची कार्य पार पाडण्यासाठी ठरविण्यात आलेली मानके

**आणि**

**मुद्दा क्रमांक :-5 (पाच) -**

त्यांच्याकडील असलेले किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेले किंवा त्यांचे कार्य पार पाडणेसाठी त्यांच्या कर्मचारी वर्गाकडून वापरण्यात येणारे नियम, विनिमय, सुचना, नियमपुस्तिका आणि अभिलेख.

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व नियम 1961 अन्वये**

**मुद्दा क्रमांक :-6(सहा)-** त्यांच्याकडे असलेल्या किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गाचे विविरण

**वर्गीकरण प्रकार अ (कायम स्वरुपी ठेवावयाची कागदपत्रे)**

- सहकारी संस्थेची नोंदणी व पोटनियम नोंदणी धारिका
- विभागीय सूचना पुस्तिका
- स्थायी आदेश धारिका
- शासन निर्णय
- भौगोलिक बदल आदेश (नवीन कार्यालय स्थापन करणे, बदल्या इ.)
- अभिलेख सुची
- निवाडा व डिक्री ओदश
- जडवस्तू संग्रह नोंदवही
- G.I.S.नोंदवही
- ग्रेडेशन यादी
- म.स.सं.नियम 1961 चे नियम 30 अनुसार सर्व कागदपत्रे
- सर्व वैधानिक आदेश
- कर्मचारी नियुक्ती आदेश धारिका (वर्ग-4) सेवा पुस्तके नियम
- नमुनेदार उपविधी (सर्व प्रकार)
- पोटनियम दुरूस्ती व संस्थेच्या नावात बदल
- सावकारी कायदा ,अधिनियम व परिपत्रके
- सावकारी परवाना नोंदवही (नमुना 1 व नियम 3)
- सावकारी परवानाधारक नोंदवही ( कलम 7)
- सावकारी परवाना रद्द आदेश (कलम 11)

**वर्गीकरण प्रकार ब (35 वर्षापर्यंत ठेवायाची कागदपत्रे)**

- लेखापरिक्षण अहवाल
- कार्यक्रम अंदाज पुस्तिका
- पेन्शन प्रकरणे (सर्व)
- कार्यालयातुन सेवानिवृत्त् होणा-या वर्ग -3 व वर्ग-4 कर्मचारी यांचे निवृत्ती वेतन प्रकरणे
- बदली आदेश
- बढती आदेश
- सेवापुस्तके
- सावकारी परवाना वितरण, रद्द करणे, नोंदणी अर्ज रद्द करणे

**वर्गीकरण प्रकार क (5 वर्षापर्यंत ठेवावयाची क कागदपत्रे)**

- सहकारी संस्थांचे वार्षिक अहवाल व लेखे
- विधानसभा/विधान परिषद प्रश्न व उत्तरे, कपात सूचना, लक्षवेधी सूचना, आश्वासने
- कामकाज वाटप आदेश
- तपासणी अहवाल
- लेखन सामुग्री मागणीपत्र
- नियुक्ती आदेश
- नियतकालीन विवरणपत्र सादरीकरण नोंदवही

- नियोजन अंदाजपत्रक
- कार्यभार हस्तांतरण
- प्रमाणित लेखापरिक्षक यांना वाटप केलेल्या संस्थांचे आदेश

**मुद्दा क्रमांक:-7(सात)** आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्यांची अमंलबजावणी करण्याच्या संबंधात लोकांशी विचार विनीमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेचा तपशिल.

प्राप्त झालेल्या धोरणात्मक बाबींवर सूचना तसेच कायदयातील दुरुस्तीबाबतचे प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात येतात.

**मुद्दा क्रमांक:-8 (आठ)-**

आपला एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून घटीत केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींच्या मिळून बनलेल्या मंडळाचे परिशिष्टांचे, समित्यांच आणि अन्य निकालाचे विवरण आणि त्या मंडळाच्या, परिषदाच्या समित्याच्या आणि अन्य निकालाच्या बैठकीत लोकासाठी खुला आहेत किंवा कसे अशा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण

महाराष्ट्र राज्य सावकारीच्या व्यवहाराचे नियमनाकरिता महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम 2014 हा कायदा दिनांक 4 एप्रिल 2014 रोजीच्या अधिसुचनेव्दारे प्रसिध्द झालेला आहे. महाराष्ट्र शासनाने दिनांक 9 सप्टेंबर 2014 रोजीच्या अधिसूचनेव्दारे ज्या क्षेत्रामध्ये निबंधक आपल्या अधिकाराचा वापर करतील व आपली कर्तव्य पार पाडतील ते क्षेत्र म्हणून निश्चित केले आहे. सावकाराने दिलेल्या कर्जावर एका वर्षात किती व्याजदर आकारवयाचा याबाबतची महाराष्ट्र शासनाने 16 सप्टेंबर 2014 रोजी

अधिसूचना प्रसिध्द केली आहे. सदर कायदयांतर्गत ज्या क्षेत्रात बेकायदेशीर सावकारी व्यवसाय केला जातो त्या क्षेत्रातील सावकाराविरुध्द कलम 16 अन्वये कारवाई करुन सावकारी बाबतची सर्व कागदपत्रे जप्त करण्याचा अधिकार निबंधकांना दिला आहे. संपादित केलेल्या स्थावर मालमत्तेची विल्हेवाट लावण्याचा अधिकार कलम 18 नुसार निबंधकांना दिला आहे. सावकारी संदर्भात प्राप्त होणा-या लेखी/ऑनलाईन तक्रारीवर चौकशी करुन कार्यवाही करण्याचा अधिकार निबंधकांना आहे.

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमनाबाबत) अधिनियम 1963 चे कलम 11 अन्वये गृहनिर्माण संस्थांनी त्यांचे 7/12 उतारा, प्रॉपर्टी कार्डवर जे प्रवर्तक,विकसक, जमिन मालक नांव लावून देणेस कसूर करतात अशा व्यक्तीं विरुध्द या कार्यालयाकडे दाखल केलेल्या अर्जावर सुनावणी करणे व आदेश पारीत करण्याचे कामकाज चालविले जाते. वैधानिक गृहनिर्माण संस्थांनी अर्ज दाखल केल्यानंतर दोन महिन्यांचे आत अर्जाशी संबंधित तुटींची पुर्तता संस्थेस कळविणे, अथवा अर्जामध्ये तुटी नसल्यास सुनावणी नोटीस निर्गमित करणे आवश्यक असून अशा विहीत कालावधीत अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही केली जाते. अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून 6 महिन्यांचे आत अर्जावर निर्णय घेणे आवश्यक असून या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जांवर विहीत कालावधीत निर्णय घेतला जातो. मानिव अभिहस्तांतरणाच्या प्रक्रियेत सुलभता यावी म्हणून शासनाने दिनांक 1 मे 2014 पासून ऑनलाईन प्रणालीव्दारे मानिव अभिहस्तांतरणाचे अर्ज स्विकारण्यात यावे अशा सूचना निर्गमित केलेल्या आहेत त्यानुसार शासनाने www.mahasahakar.maharashtra.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करुन दिलेली असुन ऑनलाईन अर्ज भरणेबाबतच्या प्रक्रियेची सविस्तर माहिती या वेबसाईटवर उपलब्ध करुन दिलेली आहे.

**मुद्दा क्रमांक :- 9 (नऊ)-** अधिका-यांची व कर्मचा-यांची निर्देशिका

**आणि**

**मुद्दा क्रमांक :-10(दहा)-**

आपल्या प्रत्येक अधिका-याला व कर्मचा-याला मिळणारे मासिक वेतन,तसेच प्राधिकरणाच्या विनियमामध्ये तरतुद केल्याप्रमाणे नुकसारभरपाई देण्याची पध्दत

| अ क्र. | अधिकार पद | अधिकारी व कर्मचारी नाव(सर्वश्री) | वर्ग | मासिक वेतन ( जानेवारी 2021 अखेर (मुळवेतन +ग्रेड पे) |
|---|---|---|---|---|
| 1 | उपनिबंधक | संगमेश्वर बदनाळे | 1 | 65000 |
| 2 | सहकार अधिकारी श्रे-1 | श्री एस.एस.मोरे | 3 | 53500 |
| 3 | मुख्य लिपिक | श्रीमती व्ही.एस.पाटील | 3 | 46200 |
| 4 | सहकार अधिकारी श्रे-2 | पदरीक्त | 3 | -- |
| 5 | सहायक सहकार अधिकारी. | डि.पी.तांबट | 3 | 30500 |
| 6 | सहायक सहकार अधिकारी | व्ही.बी.काळे | 3 | 34300 |
| 7 | सहायक सहकार अधिकारी | एस.डी.अहिरे | 3 | 35300 |
| 8 | कनिष्ट लिपिक | पदरिक्त | 3 | - |
| 9 | कनिष्ट लिपिक | पदरिक्त | 3 | - |
| 10 | प्रतवारीकार | पदरिक्त | 3 | - |
| 11 | शिपाई | पदरिक्त | 4 | - |
| 12 | शिपाई | पदरिक्त | 4 | - |

**मुद्दा क्रमांक :-11(अकरा)-**

सर्व योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमुन दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरीत केलेल्या रक्कमांचा अहवाल.

**वार्षिक योजना सन 2019-20 माहे.मार्च, 2020 अखेर झालेला खर्च.**

**आणि**

**मुद्दा क्रमांक :-12(बारा)-**

अर्थसहाय्य कार्यक्रमांच्या अमंलबजावणी ची वितरित तसेच वाटप केलेल्या रक्कमा आणि अशा कार्यक्रमाच्या लाभ धारकांचा तपशील

**आणि**

**मुद्दा क्रमांक :-13(तेरा)-**

ज्या व्यक्तींना सवलती ,परवाने व प्राधिकार पत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तींचा तपशील.

उपनिबंधक यांचे कार्यालयमार्फत राबविण्यात येणा-या योजनांची माहिती

**सन 2019-20** **(रु. लाखात)**

| अ.क | गौणशिर्ष, उपशिर्ष, प्राथमिक घटक | सन 2019-20ची अर्थसंकल्पीय तरतुद | माहे मार्च, 20 अखेर झालेला खर्च. | समर्पित बचत झाल्याची कारणे |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | 107 (02) (04) डॉ.पंजाबराव देशमुख पिक प्रोत्साहन योजना (व्याज सवलत) (जनरल)24251009 | सन 2016-17 प्रस्ताव सादर रक्कम रु 4.21/- | ----- | ---- |
| 2 | 107 (02) (04) डॉ.पंजाबराव देशमुख पिक प्रोत्साहन योजना (विघयो)24251223 | -- | --- | --- |
| | एकुण :- | 4.21/- | -- | --- |

| | | |
|---|---|---|
| 1 | योजनेचे नाव | डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना.(सर्वसाधारण) (विघयो) व (आदिवासी उपयोजना) |
| अ. | योजना केव्हापासुन कार्यान्वित आहे. | 1991 |
| ब. | योजनेचा उद्देश व स्वरुप. | या योजनेंतर्गत जे शेतकरी रु.100000/- वा त्यापेक्षा कमी पीक कर्ज घेतात आणि त्या कर्जाची व्याजासह संपुर्ण परतफेड 30 |

| | | |
|---|---|---|
| | | जुनच्या आत करतात त्या शेतक-याना भरणा केलेल्या व्याजापैकी 3 टक्के व्याज अनुदान तसेच रु.100001/- रु.300000/- पर्यंत कर्ज घेणा-या शेतक-यांना 1 टक्के व्याज सवलत पीक उत्पादन प्रोत्साहनासाठी शासनाकडुन देण्यात येते. शेतक-यांच्या पीक कर्जाची वेळेवर परतफेड होऊन या योजनेचा जास्तीत जास्त शेतक-यांना लाभ मिळावा या योजनेचा उद्देश आहे. शिवाय ही व्याज सवलत योजना असल्यामुळे शेतक-यांना पीक उत्पादनात वाढ करण्यासाठी प्रोत्साहन मिळते. |
| क. | लाभार्थी. | विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थाचे नियमित परतफेड करणारे कर्जदार सभासद. |
| ड. | अर्ज कोणाकडे करावयाचा. | संबधित तालुक्याचे उप/ सहाय्यक निबंधक. |
| इ. | मंजुरीचे अधिकार. | संबंधित जिल्हयाचे जिल्हा उपनिबंधक.सहकारी संस्था |

मुद्दा क्रमांक :-14 (चौदा)-

इलेक्ट्रॉनिक्स स्वरुपात व्याज उपलब्ध असलेल्या किंवा त्यांच्याकडे असलेल्या माहितीच्या संबधातील तपशील

**आणि**

मुद्दा क्रमांक :-15(पंधरा)-

माहिती मिळविण्यासाठी नागरीकांना उपलब्ध असणा-या सुविधांचा तपशील,तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळांचा तपशील.

उपनिबंधक सहकारी संस्था मालेगाव या कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध असणा-या सुविधांचा तपशील प्रसिध्द केलेला आहे

मुद्दा क्रमांक :-16(सोळा)-

## मालेगाव तालुक्यातील शासकीय जनमाहिती अधिकारी यांची डिरेक्टरी

| अ.क्र | कार्यालयाचे नाव पत्ता व दुरध्वनी क्रमांक | सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांचे नाव,पदनाम व दुरध्वनी क्रमांक | जनमाहिती अधिकारी यांचे नाव,पदनाम व दुरध्वनी क्रमांक | अपिलीय अधिकारी यांचे नाव,पदनाम व दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| 1 | उपनिबंधक सहकारी संस्था मालेगाव तालुका | श्री एस.एस.मोरे सहकार अधिकारी (प्र.श्रे) | श्री एस.एस.मोरे सहकार अधिकारी (प्र.श्रे) | श्री संगमेश्वर बदनाळे उपनिबंधक सहकारी संस्था मालेगाव तालुका जिल्हा नाशिक |
| | उपनिबंधक सहकारी संस्था मालेगाव तालुका | श्रीमती व्ही.एस.पाटील मुख्यलिपिक | श्री एस.एस.मोरे सहकार अधिकारी (प्र.श्रे) | श्री संगमेश्वर बदनाळे उपनिबंधक सहकारी संस्था मालेगाव तालुका जिल्हा नाशिक |
| | उपनिबंधक सहकारी संस्था मालेगाव तालुका | डि.पी.तांबट सहायक सहकार अधिकारी | श्री एस.एस.मोरे सहकार अधिकारी (प्र.श्रे) | श्री संगमेश्वर बदनाळे उपनिबंधक सहकारी संस्था मालेगाव तालुका जिल्हा नाशिक |
| | उपनिबंधक सहकारी संस्था मालेगाव तालुका | व्ही.बी.काळे सहायक सहकार अधिकारी | श्री एस.एस.मोरे सहकार अधिकारी (प्र.श्रे) | श्री संगमेश्वर बदनाळे उपनिबंधक सहकारी संस्था मालेगाव तालुका जिल्हा नाशिक |
| | उपनिबंधक सहकारी संस्था मालेगाव तालुका | एस.डी.अहिरे सहायक सहकार अधिकारी | श्री एस.एस.मोरे सहकार अधिकारी (प्र.श्रे) | श्री संगमेश्वर बदनाळे उपनिबंधक सहकारी संस्था मालेगाव तालुका जिल्हा नाशिक |

मुद्दा क्रमांक :-17 (सतरा)-

विहीत करण्यात येईल अशी माहिती.
वार्षिक माहिती संबंधी या कार्यालयाचे सांख्यिकी शाखा कामकाजाचे स्वरुप
खालीलप्रमाणे :-

17. **वा-24/ॲपेंडिक्स अे -**

दरवर्षी माहे मार्च अखेर अस्तित्वात असलेल्या सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांची संख्या निश्चीत करणे, वर्षाअखेर नवीन नोंदणी झालेल्या/पुर्नजिवन झालेल्या/अवसायानात घेतलेल्या रद्द केलेल्या संस्थांची एकत्रित संख्या मुख्य कार्यालयास सादर करणे.

18. **वार्षिक माहिती तक्ते 10 ते 51 (ANR TABLES) सादर करणे.**

दरवर्षी वा-24 नुसार निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांची वार्षिक माहिती संस्थांच्या प्रकारनिहाय प्राप्त करुन घेऊन तालुक्याचे एकत्रिकरण करुन माहिती मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक यांना सादर करण्यात येते

19. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन/राज्य सांख्यिकी गोषवार/तालुका निवडक निर्देशांक :-**

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन/तालुका निवडक निर्देशांक हे प्रकाशन दरवर्षी जिल्हा सांख्यिकी गोषवारा हे प्रकाशन अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई या कार्यालयातर्फे प्रकाशीत करण्यात येते. सदर प्रकाशनाकरीता आवश्यक असलेली माहिती वार्षिक माहितीच्या तक्त्यांच्या आधारे किंवा आवश्यक्यता वाटल्यास जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक या कार्यालयास तसेच जिल्हा सांख्यिकी कार्यालयास सादर केली जाते.

20. **इतर :-**

मुख्य कार्यालय, पुणे तसेच मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,नाशिक ,मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक या कार्यालयाकडून मागविलेली सांख्यिकी विषयक माहिती सादर करणे. तसेच खाजगी संस्था/व्यक्तिंनी मागितलेली सांख्यिकी माहिती/आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देणे.

उपनिबंधक
सहकारी संस्था मालेगाव

-----------------------------